# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 18/02/2021 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

### अवैधरीत्या विदेशी दारुची
### वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत 02 किमी अंतरावर पांढुर्णा रोड येथे दिनांक 17/02/2021 चे 16.00 वा. दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग येथील कार्यालयातील पोलिस स्टाफला गुप्त माहिती मिळाली की, एक इसम हा आपले एम.एच— 40/ ए.ए— 3330 क्रमांकाच्या झायलो वाहनामध्ये मध्ये विदेशी दारूची दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग कार्यालयातील पोलिस स्टाफने घटनास्थळी जावुन नाकाबंदी करून व त्याला थांबवून चेक केले असता कार मधील आरोपी नामे— कश्यप प्रेमलाल डहाट, वय 40 वर्ष, रा. सिरोंजी ता. सावनेर याच्या कडुन विनापरवाना व अवैधरीत्या 7200 मिली विदेशी दारू किंमती 8,000/— रू. असा एकुण वाहनासह 4,58,000/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस नाईक श्री. प्रविण निस्ताने यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ), (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम सहकलम 3/181 मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. नारायण बोरकर 9823581297 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग श्री अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात पोहवा श्री. पुष्पपाल आकरे, पोना प्रविण निस्ताने, पोशि स्वपनिल ठोंबरे, मपोना ज्योति गाडीगोने यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर